# ‘श्रीराम वेल्थ’ कंपनीची सुरुवात

## दक्षिण आफ्रिकेतील ‘सॅनलॅम’चे सहकार्य

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १६ : श्रीराम समूहाने दक्षिण आफ्रिकेच्या सॅनलॅम या वित्तीय सेवा कंपनीच्या सहकार्याने भारतात संपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्दिष्टाने श्रीराम वेल्थ लि. या संयुक्त कंपनीची स्थापना केली आहे.

श्रीराम समूह हा भारतातील वित्तीय सेवा समूहांपैकी एक आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा सॅनलॅम समूह हा जगातील ३१ देशांमध्ये विमा, मालमत्ता व्यवस्थापन आणि संपत्ती व्यवस्थापन क्षेत्रांत कार्यरत आहे. उभय समूहांचा श्रीराम वेल्थ लि. हा ५०:५० टक्के संयुक्त धोरणात्मक उपक्रम आहे. ही नवीन कंपनी, संपत्ती व्यवस्थापन, कर्जपुरवठा पर्याय, गुंतवणूक संरक्षण उपाय, जागतिक गुंतवणूक आणि वारसा नियोजन यासारख्या विविध वित्तीय सेवा पुरवेल. या सेवांना सॅनलॅमच्या जागतिक गुंतवणूक कौशल्याचे पाठबळ राहील, असे श्रीराम वेल्थचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ विकास सतीजा म्हणाले.

### ➔ पाच वर्षांचे उद्दिष्ट

कंपनीने आगामी पाच वर्षांत तब्बल पन्नास हजार कोटी रुपयांच्या निधीसाठी अॅसेट अंडर अॅडव्हाइस (एयूए) पुरविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट आखलेले आहे, असे सॅनलॅम समूहाचे सीईओ पॉल हॅनरॅटी यांनी सांगितले आहे. त्यानुसार नियोजन करण्यात येत आहे.